लोकमत
कोल्हापूर, शनिवार, दि. २७ जून २०२६

मस्ट READ

# सूर्याला खळे; खगोलप्रेमींसाठी ठरली पर्वणी

## पेठवडगाव, भादोले, लाटवडे परिसरात दिसले दुर्मीळ दृश्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापूरकरांना शुक्रवारी आकाशात एक दुर्मीळ आणि नयनरम्य खगोलीय दृश्य पाहायला मिळाले. सूर्याभोवती गोलाकार तेजस्वी वलय निर्माण झाल्याने 'सूर्याला खळे' अनेकांनी पाहिले. हवामानातील बदल व उंचावरील ढगांच्या विशिष्ट स्थितीमुळे असे दृश्य अधूनमधून दिसून येते. या अनोख्या नैसर्गिक घटनेने खगोलप्रेमींसह नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

कोल्हापूर जिल्ह्यातील पेठवडगाव, भादोले, भेंडवडे, लाटवडे परिसरात दिसणारे हे दृश्य अनेकजणांनी आपल्या मोबाईलमध्ये टिपत सोशल मीडियावर छायाचित्रे आणि व्हिडिओ शेअर केले. शुक्रवारी दुपारी साडेबाराला सूर्याभोवती गोलाकार वलय दिसत होते. हे दृश्य काही काळ पाहायला मिळाल्याने नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली होती.



कोल्हापूर जिल्ह्यातील भादोले येथे शुक्रवारी 'सूर्याला खळे' पडल्याचे दृश्य अनेकांनी अनुभवले. **छाया : नाना जाधव**

**आकाशातील या दुर्मीळ दृश्याचा अनेकांनी मनमुराद आनंद लुटलाच, शिवाय कॅमेराबद्धही केला आहे.**

## पूर्णपणे नैसर्गिक आणि वैज्ञानिक घटना

सूर्याभोवती दिसणाऱ्या गोलाकार प्रकाशवलयाला इंग्रजीत सोलर हॅलो, तर मराठीत प्रभामंडळ किंवा खळं म्हणतात.

**हा प्रकार भौतिकशास्त्रातील प्रकाशशास्त्र या शाखेशी संबंधित आहे.**

वातावरणात सुमारे २० हजार फूट उंचीवर तयार होणाऱ्या सिरस ढगांतील बर्फाच्या सूक्ष्म स्फटिकांमुळे हा परिणाम दिसतो.

**या बर्फाच्या स्फटिकांमधून सूर्यकिरणे जाताना त्यांचे अपवर्तन, परावर्तन आणि विकिरण होते.**

बर्फाचे स्फटिक प्रिझमप्रमाणे काम करतात, त्यामुळे प्रकाशाचे विविध रंग विभक्त होतात.

**हॅलोची त्रिज्या सुमारे २२ अंश असते.**

या वलयाच्या आतील बाजूस लाल रंग, तर बाहेरील बाजूस निळसर रंग दिसतो.

**हा प्रकार केवळ सूर्याभोवतीच नव्हे, तर चंद्राभोवतीही दिसू शकतो.**

सोलर हॅलो दिसणे हे वातावरणातील बर्फकणांचे अस्तित्व व हवामानातील बदलांचे सूचक मानले जाते.

**ही पूर्णपणे नैसर्गिक आणि वैज्ञानिक घटना असून त्यामागे कोणतेही दैवी किंवा अलौकिक कारण नाही.**

सूर्याभोवती खळं दिसल्यास कोणतीही अंधश्रद्धा बाळगू नये, हा प्रकाशाच्या वक्रीकरणाचा नैसर्गिक परिणाम आहे.

> **वातावरणातील उंचावर असलेल्या सिरस ढगांमधील सूक्ष्म बर्फकणांमधून सूर्यप्रकाशाचे अपवर्तन आणि परावर्तन झाल्यामुळे सूर्याभोवती सुमारे २२ अंशांचे वलय तयार होते. या खगोलीय घटनेला इंग्रजीत 'सोलर हॅलो' असे म्हटले जाते. ही घटना नैसर्गिक असून त्याचा ग्रहणाशी वा इतर कोणत्याही अशुभ घटनांशी संबंध नसतो.**
>
> **प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर,** भौतिकशास्त्र विभाग, विवेकानंद कॉलेज.

पुण्य नगरी

शनिवार, २७ जून २०२६

## विवेकानंद महाविद्यालय

प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. याप्रसंगी डॉ. सुप्रिया पाटील, समीक्षा फराकटे, नीता पाटील, डॉ. कविता तिवडे, डॉ राजश्री पाटील, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. विकास जाधव, प्रा. मयुरी गावडे, डॉ. व्ही. बी. वाघमारे, डॉ. नम्रता नरेवाडीकर, प्रा. एम. आर. नवले, प्रा. जे. आर. भरमगोंडा, प्रा. एस. पी. पंचभाई, प्रबंधक सचिन धनवडे, सदानंद दुर्गुळे, वसंत पाटील आदी उपस्थित होते.